**ठळक बातम्या**

- पाच देशांच्या दौऱ्यादरम्यान आज प्रधानमंत्री स्वीडनला पोहचले / महत्त्वाच्या विषयांवर करणार चर्चा

- केरळच्या नव्या सरकारचा उद्या शपथविधी /मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन आणि २० मंत्री शपथ घेणार

- नीट परीक्षा पेपरफुटीप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला १४ दिवसांची सीबीआय कोठडी

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत धरमशाला इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा पंजाब किंग्जवर २३ धावांनी विजय

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यांचा नेदरलँड्सचा दौरा आटोपून दौऱ्याच्या तिसऱ्या टप्प्यात आज दुपारी स्वीडनमधे गुटेनबर्ग इथं पोचले. विमानतळावर स्वीडनचे प्रधानमंत्री उल्फ क्रिस्टरसन यांनी त्यांचं स्वागत केलं. दोन दिवसांच्या स्वीडन दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी क्रिस्टरसन यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या चर्चेत व्यापार, हरित स्थित्यंतर, कृत्रिम बुद्धिमत्ता, स्टार्टअप्स, पुरवठा साखळी, संरक्षण, अंतराळ आदी क्षेत्रातल्या सहकार्यावर भर दिला जाईल. प्रधानमंत्री मोदी आणि क्रिस्टरसन युरोपियन युनियनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देअर लेन यांच्यासह युरोपियन राऊंड टेबल फॉर इंडस्ट्रीय या व्यापारी मंचाला संयुक्तपणे संबोधित करणार आहेत.

<><><><><>

केरळच्या नव्या सरकारचा शपथविधी उद्या होणार आहे. व्ही. डी. सतीशन हे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार असून त्यांच्यासोबत २० मंत्री शपथ घेतील. सतीशन यांनी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची आज संध्याकाळी भेट घेऊन त्यांना मंत्री म्हणून शपथ घेणाऱ्या आमदारांची यादी दिली. तिरूवनंतरपुरम इथं उद्या सकाळी शपथविधी सोहळ्याला सुरवात होईल.

**<><><><><>**

शत्रू देशाच्या लष्करी सामुग्रीची वाहतूक होर्मुझच्या सामुद्रधुनीतून आता होऊ दिली जाणार नाही असं इराणनं आज जाहीर केलं. आतापर्यंत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून इराणविरोधात वापरली जाणारी लष्करी सामुग्री जाऊ दिली होती, पण आता हे धोरण इराणनं बदलल्याचं इराणचे उपाध्यक्ष मोहम्मद रजा आरेफ यांनी सांगितलं. होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे होणाऱ्या सागरी वाहतुकीचं नियमन करण्यासाठी इराणनं एक यंत्रणा विकसित केल्याचं इराणच्या संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे प्रमुख इब्राहिम अजीजी यांनी म्हटलं आहे. यापुढे या मार्गावरून केवळ व्यावसायिक जहाजांना आणि इराणच्या मित्रराष्ट्रांनाच प्रवेश दिला जाईल, तसंच अमेरिकेच्या तथाकथित फ्रीडम प्रोजेक्ट अंतर्गत जहाजांना प्रवेश नाकारला जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी आज गुजरातमधल्या गांधीनगर इथं एनआयडी अर्थात राष्ट्रीय डिझाईन संस्थेत नवोन्मेष आणि इन्क्युबेशन केंद्राचं उदघाटन केलं. यावेळी ते म्हणाले…

**होल्ड - बाईट - अमीत शहा**

केंद्रीय मंत्री पीयूष गोयलदेखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी देण्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असून येत्या ३० जूनपूर्वी यासाठीची योजना जाहीर करू, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज पुण्यात केली. याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत तपशीलवार चर्चा झाली असून बाकी राहिलेल्या काही जिल्ह्यांची आकडेवारी मिळताच योजना जाहीर केली जाईल, असं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या दहा फुटी पूर्णाकृती शिल्पाचं अनावरण फडनवीस यांच्या हस्ते आज पुण्यात झालं. बुधभूषण हा ग्रंथ हातात घेतलेलं, संभाजी महाराजांचं हे देशातलं पहिलंच कांस्य शिल्प आहे. छत्रपती संभाजी महाराज उद्यानातल्या या शिल्पाशेजारी बुधभूषण ग्रंथातले ९ निवडक श्लोक आणि त्यांचं मराठी आणि इंग्रजी भाषांतर दगडी भिंतीवर कोरलं आहे.

पुणे महानगरपालिका आणि आपुलकी हेल्थकेअर यांनी संयुक्तपणे उभारलेल्या कर्करोग केंद्राचं लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

नीट प्रवेश परीक्षा २०२६चे पेपर फुटल्याप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयानं १४ दिवसांची सीबीआय कोठडी दिली आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयनं सुरु केल्यानंतर पुण्यातून आरोपीला काल अटक केली होती. नीटचा जीवशास्त्राचा पेपर फोडण्यात मांढरे प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयनं सांगितलं.

**<><><><><>**

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयच्या पथकानं आज नांदेडमध्ये चौकशी केली. एका पालकानं आपल्या मुलीसाठी पाच लाख रुपये देऊन पेपर खरेदी केल्याचा आरोप आहे. त्याबाबत ही चौकशी केली असून, अधिक चौकशीसाठी या दांपत्याला आता पुण्यातल्या सीबीआय कार्यालयात येत्या मंगळवारी बोलावलं

आहे. नांदेडमधल्या आणखी काही पालकांची चौकशी होणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज धरमशाला इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं पंजाब किंग्जवर २३ धावांनी विजय मिळवला. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून २२२ धावा केल्या. व्यंकटेश अय्यरच्या नाबाद ७३ धावांचा त्यात मोलाचा वाटा आहे. विराट कोहलीनं ५८, तर देवदत्त पडिक्कलनं ४५ धावांचं योगदान दिलं. या धावसंख्येचा पाठलाग करताना पंजाब किंग्जला २० षटकात ८ गडी गमावून १९९ धावाच करता आल्या.

या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या ७ षटकात १ बाद ८६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

शाश्वत विकासासाठी गावं आणि शेतकऱ्यांना समृद्ध करण ही आपली सामाजिक जबाबदारी आहे असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे ते आज नागपुरात पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ‘नागपूर जलसंवाद’ या राष्ट्रीय परिषदेत अध्यक्षीय भाषणात बोलत होते. विदर्भातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागे पाण्याची कमतरता हे प्रमुख कारण आहे. यावर जलसंधारण या उपाय आहे मात्र त्यासाठी लोकसहभागाची आवश्यकता आहे. ग्रामपंचायतींपासून लोक प्रतिनिधींपर्यंत सर्वांनी मिळून यासाठी काम करण्याची गरज आहे. त्यामुळेच

आपल्या गावांना आणि शेतकऱ्यांना समृद्ध बनवणं शक्य होईल, असं गडकरी म्हणाले.

<><><><><>

रशियाची राजधानी मॉस्को आणि लगतच्या परिसरात युक्रेननं केलेल्या ड्रोन हल्ल्यांमध्ये तीन जण मृत्युमुखी पडले असून यात एका भारतीयाचाही समावेश आहे.  रात्री झालेल्या या हल्ल्यांमध्ये १२ जण जखमी झाल्याचं मॉस्कोच्या महापौरांनी सांगितलं. जखमींमध्येही तीन भारतीय असल्याची माहिती रशियातल्या भारतीय दूतावासानं दिली आहे. दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

रशियानं किव इथं केलेल्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यानंतर हा हल्ला झाला आहे. किव इथल्या हल्ल्यात २४ जण मारले गेले होते.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येत्या २५ तारखेला वर्ष २०२६ साठीचे पद्म पुरस्कार प्रदान करतील, अशी माहिती केंद्रीय गृह मंत्रालयानं दिली आहे. राष्ट्रपती भवनात या वर्षीच्या पहिल्या नागरी पुरस्कार प्रदान सोहळ्यात राष्ट्रपती पद्म विभूषण, पद्म भूषण आणि पद्मश्री पुरस्कार प्रदान करतील. यंदा १३१ जणांना पद्म पुरस्कार घोषित असून यात पाच पद्म विभूषण, १३ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कार आहेत. १६ व्यक्तींना मरणोत्तर सन्मान असून पुरस्कार प्राप्त व्यक्तींमध्ये १९ महिला आहेत.

<><><><><>

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरी गटात भारताच्या सात्विक साईराज रांकी रेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. इंडोनेशियाच्या लिओ रोली कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन या जोडीनं त्यांचा २१ - १२, २५- २३ असा पराभव केला.

**<><><><><>**

चीनमध्ये सुरू असलेल्या बाओजी चायना मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या श्रियांशी वलीशेट्टी हिने महिला एकेरी प्रकारात रौप्यपदक पटकावलं. अंतिम फेरीत चीनच्या आन ची युआन हिच्याकडून तिला १४-२१,६-२१, अशा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या 'मन की बात' कार्यक्रमातून येत्या ३१ मे रोजी रविवारी सकाळी अकरा वाजता जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असणार आहे.

या कार्यक्रमासाठी, नागरिकांना मोफत दूरध्वनी क्रमांक १८०० -११– ७८०० यावर आपले विचार आणि सूचना पाठवता येतील. तसंच, नरेंद्र मोदी ॲप आणि माय जी ओ व्ही ओपन फोरम च्या माध्यमातूनही माहिती पाठवता येऊ शकते. यासह १९२२ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन आणि त्यानंतर एस.एम.एस.वर प्राप्त लिंकद्वारेही आपल्या सूचना पाठवता येतील.

//<><><><><>//